महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# 'ई-साहित्य' हाच भावी साहित्यप्रकार

Dec 22, 2014, 07.44AM IST




म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

लेखक-साहित्यिक त्यांना हवे ते लिहित आहेत आणि म्हणून वाचक ते वाचत आहेत; त्यांना असे साहित्य आवडते आहे की नाही याची फारशी पर्वा नाही...हे सध्याचे चित्र फार काळ राहणार नाही. सर्जनशीलता, कल्पकता, नवी वाट धुंडाळण्याची आस अशा विविध गुणवैशिष्ट्यांनी युक्त आणि प्रयोगशीलता ठासून भरलेल्या ई-साहित्य व्यवहाराने मराठी साहित्य विश्वाचे चित्रच पालटणार आहे, असा दृढ विश्वास ही वाट चोखाळणाऱ्या धुरिणांनी रविवारी 'मटा मैफल'च्या चौथ्या पुष्पात व्यक्त केला. युवा पिढीला वाचायला आवडते, त्यामुळे त्यांना हवे ते वाचायला दिले तर लेखकांना आसमंत खुला आहे, अशा आशयाचा आशावादही 'ई-साहित्य व्यवहार- वर्तमान आणि भविष्य' या विषयावरील या परिसंवादात मान्यवरांनी व्यक्त केला.

'मटा मैफल'च्या दुसऱ्या दिवसातील या पहिल्या परिसंवादासाठी वेलिंगकरच्या हॉलमध्ये युवा साहित्यप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. टॅब, आयपॅड, मोबाइल, ई-रीडर अशा आधुनिक साधनांशी नाळ जुळलेल्या या तरुणाईच्या साक्षीने 'ई-साहित्य प्रतिष्ठान'चे सुनील सामंत, 'बुक गंगा डॉट कॉम'च्या सुप्रिया लिमये, 'मिसळपाव डॉट कॉम'चे रामदास बिवलकर आणि ई-साहित्य व्यवहारात मुशाफिरी करणाऱ्या नवोदित लेखिका मेघना भुस्कुटे यांच्याशी मटाचे रवींद्र मांजरेकर यांनी संवाद साधला.

हल्लीचा तरुण वर्ग वाचतच नाही, हे सरसकट केले जाणारे विधान साफ चुकीचे आहे. आज मोबाइल असो वा टॅब, तरुण-तरुणी सतत काही ना काही वाचत असतात. लेखक-प्रकाशकांनी केवळ त्यांना हवे ते वाचायला द्यायचा अवकाश आहे, असे मत मेघना यांनी मांडले. तर सामंत यांनी काही तरुण-तरुणी अगदी रस्ता क्रॉस करतानाही मोबाइलमध्ये काही तरी वाचत असतात, हे कशाचे द्योतक आहे, असा प्रश्न उपस्थित करत त्यांना स्वस्तात, अगदी एक रुपयात साहित्य उपलब्ध होण्याची गरज व्यक्त केली. ई-साहित्य हे असेच अगदी स्वस्तात आणि सुलभपणे साहित्य उपलब्ध करणारे व्यासपीठ असल्याने ते काळाची गरज असल्याचे मतही त्यांनी मांडले. बिवलकर यांनी युवा पिढीची भाषा बोलून नावारूपाला आलेल्या चेतन भगत यांचे उदाहरण देत, मराठीतही असे युवा पिढीला भावणारे लेखन करण्याचे आवाहन लेखकांना केले. तर लिमये यांनी सोशल मीडियावर सदैव व्यक्त होणाऱ्या तरुण वर्गाला वाचायला काय हवे आहे, हे ओळखून लेखकांनी लिखाण करण्याची गरज व्यक्त केली. त्याचवेळी तरुण वर्गाला हव्याहव्याशा ई-साहित्य व्यवहाराच्या या आधुनिक व्यासपीठाविषयी चर्चा घडवल्याबद्दल 'मटा मैफल'चे आवर्जून आभार मानतानाच साहित्य संमेलनांमध्येही असे संवाद घडण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

जुन्या साहित्याचे हवे डिजिटायझेशन

'काही वर्षांपूर्वी ऑर्कुटवर संवाद साधत एका ग्रुपशी जोडला गेलो. त्यातली तरुण मंडळी छान कविता करायचे. मग एका क्षणी या कवितांचे पुस्तक प्रसिद्ध करण्याचे ठरले. म्हणून मी प्रकाशकांच्या दारांवर जायला लागलो.

पण कवितांचे पुस्तक छापण्यास कोणीच धजावेना. तेव्हा लेखक प्रसिद्ध असल्याशिवाय प्रकाशक पुस्तक छापत नाही आणि आणि पुस्तक छापले जात नाही म्हणून लेखक प्रसिद्ध होत नाही; तर दुसरीकडे, वाचकांना हवे ते साहित्य वाचायलाच मिळत नाही, असे दुष्टचक्र माझ्या लक्षात आले. म्हणून आम्ही ई-बुकचा निर्णय घेतला आणि त्यातून ई-साहित्य या वेबसाइटचे व्यासपीठ जन्माला आले', असा आपला प्रवास सांगत आजच्या घडीला वेबसाईटवर ४५० पुस्तके प्रकाशित झाल्याचे सामंत यांनी सांगितले. तर एकाच्या माध्यमातून दुसऱ्याशी आणि तिसऱ्याच्या माध्यमातून चौथ्याशी कनेक्ट होत आजपर्यंत दीडशे ते दोनशे लेखकांना लिहिते केले आणि जवळपास ३२ ते ३३ हजार वाचकांशी जोडलो गेलो, असे बिवलकर यांनी सांगितले. लिमये यांनी केवळ मराठीच्या प्रेमापोटी बुकगंगाची स्थापना केल्याचे सांगत त्यावर आज १२ हजारहून अधिक मराठी पुस्तके उपलब्ध असल्याचे सांगितले. तर 'बेंगळुरूमध्ये नोकरीनिमित्त असताना मराठीशी काहीच संबंध न उरल्याने इंटरनेटवर सर्फिंग करताना ब्लॉगची संकल्पना कळली. त्यात मांडलेल्या विचारांना लगेच प्रतिसाद मिळतो आणि पैचाही खर्च न करता आपले साहित्य आपण प्रसिद्ध करू शकतो, ही कल्पना भावली. त्यातूनच वाचकांच्या अपेक्षा कळत गेल्या आणि मी लिहित राहिले', असे भुस्कुटे यांनी लेखिका होण्याचा प्रवास मांडताना सांगितले. वेबसाइट सुरू करून ती चालवणे आणि त्यावर साहित्याचा प्रसार करणे हे फारसे खर्चिक नसते. मात्र, त्यात मराठीप्रेमींनी सहभाग घेणे महत्त्वाचे असल्याचे मत सर्व वक्त्यांनी मांडले. तसेच तंत्रज्ञानाची ओळख नसलेल्यांनाही अशा संस्थांशी संपर्क साधून आपले साहित्य प्रसिद्ध करता येऊ शकते. सध्या विशिष्ट फॉण्टविषयी अडचणी येत असल्या तरी त्या दूर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तथापि, ई-साहित्यमध्ये जुन्या साहित्याच्या डिजिटायझेशनला वेग देण्याची गरज असल्याचे मत बिवलकर, सामंत व लिमये यांनी यावेळी मांडले.

सेन्सॉरशिप नको

या आधुनिक प्रकारात साहित्य प्रसिद्ध करणे सोपे आणि स्वस्त असल्याने जातीय-धार्मिक तेढ किंवा अश्लील स्वरूपाचा मजकूर प्रसिद्ध होणे सुरू झाले आहे. त्यावर सरकारी वा कोणत्याही यंत्रणेचे नियंत्रण नाही. हे वाढीस लागले तर धोकादायक असल्याने ई-साहित्य व्यवहारावर कोणाचे तरी नियंत्रण असायला हवे, असे मत सामंत यांनी मांडले. मात्र, बिवलकर व भुस्कुटे यांनी या मताशी फारकत घेत नियंत्रण लादणे अयोग्य ठरेल, असे मत मांडले. हे माध्यमांचे लोकशाहीकरण आहे. त्यात चांगल्या साहित्याला सकारात्मक तर वाईट साहित्याला नकारात्मक श्रेणी मिळते. नकारात्मक श्रेणीचे प्रमाण वाढले की ते संबंधित साहित्य आपोआप नामशेष होते. परिणामी जे चांगले तेच शेवटी कायम राहील, असा युक्तिवाद भुस्कुटे यांनी मांडला. लिमये यांनी मात्र ई-साहित्यातही संस्करण आणि संपादन हे आवश्यक असल्याचे सांगत पुस्तकांची पायरसी टाळण्यासाठी सुरक्षेचे मापदंडही लावणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

प्रकाशकांनी आमचे आभार मानावेत

छापिल पुस्तकांमध्ये उपलब्ध असलेले साहित्य आम्ही दूरवर पोचवतो आणि त्यावर चर्चा घडवतो. त्यामुळे खरे तर पारंपरिक साहित्य व्यवहारातील प्रकाशकांनी आमचे आभार मानायला हवेत, असे म्हणत भविष्यात एक दिवस असा येईल की, पुस्तकासोबतच चिपही असेल, असे भाकित बिवलकर यांनी केले. तसेच आगामी दोन वर्षांत जैविकदृष्ट्या विघटन होणारा कागद बाजारात येईल. तो स्वस्त असेल आणि त्यामुळे वाचकांना पुस्तकेही स्वस्त मिळतील, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.